जा.क्र.नांवाशमनपा/नसका/**CR-67**/२०१३
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-१८.०६.२०१४

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**सर्वसाधारण सभेची सूचना**
**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण-२ मधील**
**नियम क्र.१ अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे अनुसूचि (ड) चे प्रकरण २ मधील नियम क्र. १ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार मा. महापौर **श्री अ.सत्तार अ.गफुर** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दिनांक **२६.०६.२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चवथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति,

______________________________

श्री / श्रीमती
सदस्य / सदस्या, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.१:-**

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

**लिंग गुणोत्तर -२०१४**

| अ. क्र. | महिना | एकुण जन्म | | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १. | जानेवारी | १५७८ | १४६७ | ३०४५ | ९२९.६५ |
| २. | फेब्रुवारी | १५२२ | १२७९ | २८०१ | ८४०.३४ |
| ३. | मार्च | १६९५ | १५८७ | ३२८२ | ९३६.२८ |
| ४. | एप्रिल | १०९० | ९८१ | २०७१ | ९००.०० |
| ५. | मे | १९०५ | १७०१ | ३६०६ | ८९२.९१ |

**विषय क्र.२:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या आरोग्य विभागाकरीता स्वर्गरथ बांधणी करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदरच्या स्वर्गरथ वापराचे नियम व शुल्क खलील प्रमाणे आकारण्याकरीता मान्यता प्रदान करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१. स्वर्गरथचा वापर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड चे हद्दिपुरता व शहराजवळील उपनगरापुरता करण्यात यावा.
२. कोणत्याही परिस्थितीत स्वर्गरथ बाहेरगावचे वापरासाठी नेता योणार नाही.
३. स्वर्गरथचे भाडे प्रति तीन तासाकरीता रू.१,०००/- आकारण्यात यावे. तीन तासापेक्षा जास्तीचा कालावधी लागत असल्यास प्रति तास रू. १००/- वेटिंग चार्ज आकारण्यात यावा.

**विषय क्र.३:-**

पशु वैद्यकिय दवाखाना अशोकनगर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या दवाखान्यात आनलेल्या जनावर खालील प्रमाणे शुल्क घेवून सुविधा देण्यात येते. सदरील प्रस्तावास मान्यता देणे बाबत.

| अ.क्र. | देण्यात येणा-या सुविधाचे स्वरुप | शुल्क रु. |
|---|---|---|
| १ | प्रत्येक जनावराचह ओ.पी.डी.फिस | १०/- |
| २ | एनटी रॅबिज लस(ए.आर.व्हि.) व सलाईन | ५०/- |
| ३ | लहान शस्त्रक्रिया | १००/- |
| ४ | मोठी शस्त्रक्रिया | २००/- |

तसेच वरील शुल्कात प्रत्येक आर्थिक वर्षात दरवर्षी १० टक्के प्रमाणे शुल्कात वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.४:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित मनपाचे माता गुजरीजी विसावा उद्यान हे जवळपास पाच (०५) एकर क्षेत्रामध्ये पसरलेले असुन हे शहरातील जुने व एकमेव विरंगुळयाचे ठिकाण आहे. सदरील उद्यानामध्ये मुलांच्या विरंगुळयासाठी एक फॅमिती ट्रेन, एक मिनी ट्रेन, एक मेरिगोराउंड तसेच घसरगुंड्या, सिसॉ, झेके, इत्यादि साहित्य लावलेले आहेत. विरंगुळयाच्या साहित्यासोबतच उद्यानामध्ये ट्रि हाउस, हुतात्मा स्मारक, ज्युरासिक पार्क, कारंजे, विस्तीर्ण लॉन, वृक्षवल्ली, अंतर्गत रस्ते, दिवाबत्ती, पाण्याची सोय अस्तित्वात आहे. उद्याानामध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी खाण्यापिण्यासाठी भेलपुरी सेंटर, ज्युस व आईसक्रिमची दुकाने आहे.

उद्यानाच्या देखभाल, दुरुस्ती व दैनंदिन रखवालीसाठी सध्या मनपाचे जवळपास ०६ चौकीदार, ०५ माळी, ०६ माळण, ०३ ऑपरेटर, ०४ बुकींग लिपिक, ०४ खजगी सुरक्ष रक्षक व .१ सुपरवाझर कार्यरत आहेत. सदरील मनुष्यबळाच्या मासिक वेतनावर होणारा खर्च तसेच उद्या ानापासुन मिळणारे उत्पन्न याचा ताळमेळ पहाता मोठयाप्रमाणामध्ये तुट दिसुन येते. उत्पन्न कमी व होणारा खर्च जास्ती आहे. या उद्यानात बरेच कर्मचारी लागत असल्यामुळे इतरत्र असलेल्या उद्यानांची देखभाल व दुरुस्ती तसेच उद्या ान विभागतल्या इतर दैनंदिन काया्रलयीन कामांवर मनुष्यबळ कमी पडत आहे.

उद्यानाच्या खाजगीकरणाविषयी अभ्यास केला असता, नागपुर मनपामध्ये उद्यानाचे खाजगीकरण केलेले आहे. त्या धर्तीवर माता गुजरीजी विसावा उद्यानाचे सुध्दा खाजगीकरण करता येणे शक्य आहे. उद्यानाचे खाजगीकरण केल्यास मनपाचे कर्मचारी इतर उद्यानांत कामासाठी उपलब्ध होऊन मनपाच्या कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या खर्चावर आळा बसुन मनपाचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल. खाजगीकरणामुळे मनपाचे उत्पन्न वाढुन नागरीकांना जास्तीच्या सुविधा पुरविणे शक्य होईल. माता गुजरीजी विसावा उद्यानाचे खाजगीकरण करणे करिता प्रथमत: खाजगी कंत्राटदाराकडुन Expression of Interest मागवून खाजगी कंत्राटदार निश्चित करणे शक्य आहे.

करिता माता गुजरीजी विसावा उद्याानाचे खाजगीकरण करणेकरिता प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे सादर.

**विषय क्र.५:-**

महानगरपालिकेच्या मालकीच्या महात्मा फुले बहुउदेशिय सभागृहाचा वापर सध्यस्थितीत लग्न समांभासाठी करण्यात येत असून सदर सभागृहास महानगरपालिकेस मिळणारे उत्पन्न अल्प असून उत्पन्नापेक्षा व्यवस्थापनावर होणारा खर्च अधिक असल्याने मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२ दि.२.४.२०१३ अन्वये सदर ठिकाणी बीओटी/एफबिटी तत्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम केल्यास मनपास कायम स्वरुपी मोठया प्रमाणात उत्पन्न मिळेल व सदर व्यापारी संकुल पार्कीग व इतर सुविधेसहच्या आराखडयाचा तसेच व्यापारी संकुल बांधकामाच्या अटी व शर्तीचा प्रस्ताव सादर करणे बाबतचा ठराव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावित महात्मा फुले मार्केट मुख्य बाजारपेठेत असल्याने सदर ठिकाणी व्यापारी दृष्टीकोनातून व्यापारी गाळे, भाजी मार्केट,वाहनतळ इत्यादी सुविधा दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे. त्यामूळे सल्लागार फोरट्रेस इन्फ्रा. ॲण्ड अडव्हायजरी सर्व्हीसेस यांना सदर ठिकाणी बीओटी तत्वावर व्यापारी संकुल संपूर्ण सुविधेसह बांधकामाचा आराखडा व अहवाल सादर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या त्याअनुषंगाने सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर मार्केट पुर्नविकसित केल्यास वाहन तळासाठी जागा उपलब्ध्द होवून व अस्तित्वातील भाडेकरुंचे व समारंभहॉलचे या ठिकाणी पुर्नवसन करणे शक्य होईल तसेच अहवालानूसार महात्मा फुले बहुउध्देशिय सभागृहाच्या इमारत तळघर + G + २ असून अंदाजित प्रकल्प खर्च रु.२०९३.४६ लक्ष असून यातून खालील प्रमाणे सुविधा होवू शकतील.

| अ.क्र. | मजला | सुविधा |
|---|---|---|
| १ | तळघर क्षेत्रफळ ३१७५.२१ चौ.मी.<br>वाहन तळ क्षेत्रफळ २६५०.२३ चौ.मी.<br>दुकान बांधकाम क्षेत्रफळ ४७०.४० चौ.मी. | *स्वतंत्रपणे प्रवेश व बाहेर जाण्याचा मार्ग<br>*चार चाकी पार्कीग (अंदाजित ५४ चारचाही वाहन)<br>*दुचाकी पार्कीग (अंदाजित २१२ दुचाकी वाहन)<br>*३० दुकाने (पुर्नवसन) |
| २ | तळमजला क्षेत्रफळ २३८२.१२ चौ.मी.<br>बांधकाम क्षेत्रफळ १४९१.२८ चौ.मी. | *एकूण १५ दुकाने व दुकानांना मेनरोडकडून स्वतंत्र प्रवेश यांचे एकूण क्षेत्रफळ १०७७.१२ चौ.मी.<br>*अस्तित्वातील ९ दुकानांचे पुर्नवसन क्षेत्रफळ १४४.८४ चौ.मी.<br>*भाजीपाला मार्केट एकूण ४२ गाळे क्षेत्रफळ १६३.३३ चौ.मी. |
| ३ | पहिला मजला क्षेत्रफळ १९६८.३४ चौ.मी.<br>बांधकाम क्षेत्रफळ १२४९.७० चौ.मी. | *व्यापारी संकुल एकूण क्षेत्रफळ ९५४.९७ चौ.मी.एकूण १४ दुकाने पुर्नवसन फंक्शन हॉल क्षेत्रफळ १८०.०० चौ.मी.यासाठी स्वतंत्रपणे मेनरोड कडून प्रवेश<br>*शौचालय सुविधा |
| ४ | दुसरा मजला क्षेत्रफळ ४००.९४ चौ.मी.<br>बांधकाम क्षेत्रफळ २४०.५२ चौ.मी. | *हॉल क्षेत्रफळ १८०.३३ चौ.मी.<br>(महात्मा फुले बहुउद्देशिय सभागृह) |

वरील बाबीनुसार सदर ठिकाणी भाजीमार्केट, व्यापारी गाळे, दुचाकी व चारचाकी वाहन तळ,फंक्शन हॉल ई.सर्व सोईयुक्त दोन मजली देखणे संकुल महात्मा फुले मार्केट येथे बीओटी/एफबीटी तत्वावर उभारणे शक्य होणार आहे. सदर व्यापारी संकुल शहरातील मुख्य रहदारीच्या रस्त्यावर अल्यामूळे सदरच्या संकुलामूळे शहराच्या सौदर्यात भर पडणार असून सदर परिसरातील वाहन तळाचाही प्रश्न सुटणार आहे.

सल्लागारांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालातील बाबी खालील प्रमाणे आहेत.

१. अस्तित्वातील सर्व भाडेकरुंना सामावून धेण्यासाठी खालचे व वरचे ( तळघर व तळमजल्याचे) व्यापारी गाळे व सभागृह त्याचे भाडे महानगरपालिकेस मिळणार आहे.ज्याची अंदाजे बांधकामाची किंमत रु.७९६ लक्ष मिळणार आहे (त्याचे नियम व अटी भाडे ठरविण्याचा अधिकार महानगरपालिकेस असेल)

२. एकूण २२१२.४२ चौ.मी.क्षेत्रफळाचे दुकाने व सभागृह विकासक महानगरपालिकेस बांधून देणार आहे व या क्षेत्रफळाचा भाग ६० वर्षाच्या लिजवर देण्यात येवून यापोटी महानगरपालिकेस सदर दुकानातून १३५.८५ लक्ष भाडे मिळेल.

३. जागेची मालकी महानगरपालिकेची राहणार आहे.विकासकाकडून इमारत विकासापोटी महानगरपालिकेस अंदाजे २६०.६७ लक्ष इतकी रक्कम मिळेल

**निविदाधारकाची पात्रता** :-

१. निविदाधारकांनी यापुर्वी ५०००० चौ.फुट (बिल्डअप एरिया) आकारापर्यतचे एक अथवा ३०००० चौ.फुटापर्यतचे किमान दोन अथवा २५००० चौ.फुटापर्यतचे किमान तीन या सारख्या इमारतीचे बांधकाम मागील पाच वर्षात पुर्ण केले असेण आवश्यक आहे.

२. निविदाधारकास (पीपीपी) तत्वावर अशा पध्दतीच्या इमारतीचे बांधकाम केले असल्यास प्राधान्य देण्यात येईल

३. निविदाधारकाचे मागील तीन वर्षातील उलाढाल किमान १३ कोटी असणे आवश्यक आहे.तसेच त्याची संपत्ती (नेट वर्थ) किमान १० कोटी असणे आवश्यक आहे.

४. निविदाधारक अनुभव तसेच आर्थिकनिकषांमध्ये पात्र झाल्यास महानगरपालिकेस देय असणा-या उच्चत्तम विकासक शुल्क देणा-या निविदाधारकास पात्र ठरविण्यात येईल.

५. निविदाधारकाने प्रकल्प किंमतीच्या १% महानगरपालिकेस रु.२१ लक्ष प्रकल्प विकास शुल्क (ना परतावा स्वरुपातील ) भरणा करणे

६. पात्र निविदाधारकाने प्रकल्प किंमतीच्या ५% अंदाजे रु.१०० लक्ष सुरक्षा अनामत स्वरुपात महानगरपालिकेकडे भरणा करणे आवश्यक आहे. अस्तित्वातील भाडेकरुंच्या पूर्नवसनाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर रक्कमेपैकी ५० % रक्कम निविदाधारकास परत करण्यात येणार असून उर्वरीत ५० %रक्कम कामाच्या देखभाल व दुरुस्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

वरील बाबी विचारात घेता महात्मा फुले व्यापारी संकुलाचा आराखडा तसेच व्यापारी संकुल बांधकामासाठी निविदा अटी व शर्तीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

**विषय क्र.६:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थापना दि.२६ मार्च १९९७ रोजी वाघाळा नगरपालिकेचा नांदेड नगरपरिषदेत समावेश करून झालेली आहे. सदर वाढीव क्षेत्रामध्ये मौ. वाघाळा, मौ. असदवन, मौ. फत्तेजंगपुर, मौ. आसरजन, मौ. वसरणी, मौ. रहिमपुर, मौ. कौठा, मौ. म्हाळजा, मौ. जंगमवाडी (भागश:) मौ. सांगवी (भागश:) या गावांचा समावेश करण्यात आला आहे. तद्नंतर मौ. तरोडा (खु.) व मौ. तरोडा (बु.) या गावांचा महानगरपालिका हद्दीत दि.१ जूलै २००९ रोजी व मौ. ब्रम्हपूरीचा उर्वरित भागाचा महानगरपालिका हद्दीत दि.२० ऑगस्ट २००९ रोजी समावेश करण्यात आलेला आहे. यापूर्वी नांदेड वाघाळा शहर महानगपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३२, दि.३०.१२.२०१० अन्वये वाढीव क्षेत्र तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजन एकत्रिरित्या तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (३) व कलम २३ (१) नुसार इरादा प्रसिध्द करण्याचा व वाढीव हद्दीसाठी विकास योजना तयार करणे करिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(३) नुसार मनपास मुदतवाढ ही मिळणे करिताचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २४ अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांची नगर रचना अधिकारी नियुक्ती करण्यास व जाहीर क्षेत्राचा विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणेकामी खजगी एजेन्सीची नेमणूक करण्यासाठी ठराव पारीत झालेला आहे. तसेच, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. ५६ दि०८.०८.२०११ अन्वये वाढीव क्षेत्र तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना एकत्रितरित्या तयार करण्यासाठी शासन स्तरावर नगररचनाकार यांच्या अधिपत्याखाली विकास योजना विशेष घटकाची स्थापना करणे तसेच, नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी सहाय्यक संचालक नगर रचना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांची नगर रचना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यासाठी पारीत करण्यात आलेला असून याबाबत मा. सहा. संचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापि, विशेष घटक तसेच नगर रचना अधिकारी यांची नियुक्ती अद्याप झालेली नाही. मा.संचालनायकडून उपलब्ध्द होणा-या विकास योजना, विशेष घटकासाठी विविध संवर्गातील एकूण १८ अस्थायी पदे आहेत .त्यानूसार मा.उपसंचालक ,नगररचना यांचे अधिपत्याखाली विविध संवर्गातील अस्थायी १८ पदांचे विकास योजना विशेष घटक कार्यालय कार्यान्वीत करणे आवश्यक असून कार्यालतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते विषयक येणारा वार्षिक किमान अंदाजित खर्च रु.८७,५४,३००/-करण्यास व सदर कार्यालयास जागा,वाहन,दुरध्वनी,संगणक, स्टेशनरी फर्निचर ई.आवश्यक बाबींची पुर्तता करण्यास तयार असल्याबाबत महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८ दि.२२.८.२०१२

पारीत झालेला आहे त्याबाबत मा.संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे पत्र क्र.८०२ दि.१४.९.२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये कन्सलटींग इजिनियअरींग सर्व्हीसेस (इंडिया प्रा.लिमिटेड) पुणे यांना वाढीव भागाचा विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करण्याची निविदा मंजुर करण्यात आलेली असून त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. मा.संचालक,नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र.६६७ दि.५.२.२०१४ अनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नव्याने समाविष्ट भाग व वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करणेकामी नव्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३४ सह कलम २३ अंतर्गत विकास योजना तयार करणेबाबतचा इरादा जाहिर करणे व उपसंचालक, नगररचना विकास योजना, विशेष घटक कार्यालयाची नांदेड येथे स्थापना करण्यात येवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये उपसंचालक, नगररचना यांची नगरररचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.७:-**

**<u>आदेश</u>**

विषयः- मनपा निवृत्ती वेतनधारक/कुटूंब नि. वेतनधारक यांचे निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर महागाई भत्ता वाढ करणे बाबत.

संदर्भः- १. महाराष्ट्र शाासन निर्णय क्र.निमवा/२०१३/प्र.क्र.७७/सेवा ४ दि.८ मे २०१४.

२. मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२८.०५.२००२

संदर्भ क्र. १ चे महाराष्ट्र शासन निर्णयानुसार निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे वेतनावर दि.०१ जानेवारी २०१४ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ९०% वरून १००% करण्यात आला असून दि. ०१ मे २०१४ पासून सदर महागाई वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. त्यानुसार मनपा निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे मुळ निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर संदर्भ क्र.२ चे मनपा सर्वसाधारण सभेने ठरावाद्वारे दिलेल्या मान्यतेनुसार कार्योत्तर मान्यतेस अधिन राहून दि.०१ मे २०१४ पासून महा.भत्ता ९०% वरून १००% या दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात येते. यावर लागणारा खर्च मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्र.८:-**

**<u>आदेश</u>**

विषयः- असुधारीत वेतनश्रेणीत निवृत्ती वेतनधारक/कुटूंब नि. वेतनधारक यांचे निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर महागाई भत्ता वाढ करणे बाबत.

संदर्भः- १. महाराष्ट्र शाासन निर्णय क्र.निमवा/१११३/प्र.क्र.२२/सेवा ९ दि.२३ जानेवारी २०१३.

२. मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२८.०५.२००२

संदर्भ क्र. १ चे महाराष्ट्र शासन निर्णयानुसार असुधारीत वेतनश्रेणीत निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे वेतनावर महागाई वाढ दि. ०१ जुलै, २०१३ पासून दरमहा १६६% वरून १८३% या दराने महा.भत्ता वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार मनपा असुधारीत वेतनश्रेणीतील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे मुळ निवृतती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर संदर्भ क्र.२ चे मनपा सर्वसाधारण सभेने ठरावाद्वारे दिलेल्या मान्यतेनुसार कर्योत्तर मान्येतेस अधिन राहून दि.०१ जानेवारी २०१३ पासून महा. भत्ता १६६% वरून १८३% दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात येते. असुधारीत वेतनश्रेणीतील सेवानिृत्त कर्मचाऱ्यांना वेळोवळी महागाई वाढ मंजूर करण्यात येत असल्याने असुधरीत वेतनश्रेणी व सुधारीत वेतनश्रेणी यामध्ये तफावत होत असल्याने त्यांना देय होत असलेले अग्रीम रक्कम रूपये ५००/- (अक्षरी रूपये पाचशे रूपये केवळ) माहे मे २०१४ पासुन बंद करण्यात येते. यावर लागणारा खर्च मनपा अंदाज पत्रकातील संबंधीत शिर्षकातून करण्यात यावा.

**विषय क्र.९:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड चा सालसन २०११-१२ स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबाद च्या लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाला असून महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम १०७ अ नुसार सदर लेखा परिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करेल त्यानंतर आयुक्त मनपा महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियामातील तरतुदीनुसार अहवालावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करेल अशी तरतुद असल्यामुळे सदर लेखा परिक्षण अहवाल माहितीस्तव सादर करण्यात येते तद्नंतर अहवालावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. |